नि.दि.दावा क. २१/२०२१
संतोष वि. किशोर

नि.क्र.६० पुढे

**<u>निशाणी क्र. ६५ वरील दिनांक २७.०१.२०२६ रोजीच्या आदेशाप्रमाणे उलटतपास–</u>**

**<u>शपथेवर उलटतपास वादी मार्फत अधिवक्ता ॲड. श्री थुटे यांचेमार्फत.</u>**

हे म्हणणे खरे आहे की, शेत स.नं. २३८ हि खरेदी करण्यापुर्वी मी संपूर्ण चौकशी केली होती. चौकशी दरम्यान मी शेत सर्व्हे नंबर २३८ बाबत महसूल कागदपत्रे बघितली होती. हे म्हणणे खरे नाही की, शेत सर्व्हे नंबर २३८ चा जुना सर्व्हे नंबर ७४/२ होता. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या शेताला लागून पश्चिमेस वादीचे शेत सर्व्हे नंबर २३९ आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शेताच्या पुर्वेस खंडाळा ते गोविंदपुर असा रस्ता आहे. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, शिव आहे. हे म्हणणे खरे आहे की, शिवेचा वापर रस्ता म्हणून केला जातो. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. ०२ ते ०६ चे सासरे व वादीचे वडील हे सख्खे भाउ होते. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. ०२ ते ०६ चे सासरे व वादीचे वडील यांची संयुक्त मिळकत नंबर ७४ होती. हे म्हणणे खरे नाही की, शामराव व बापुराव यांच्यामध्ये वाटण्या झाल्या. सदर वाटणीमध्ये वादीचे वडील बापुराव यांच्या हिस्सयास शेत सर्व्हे नंबर ७४/१ आला किंवा कसे मला माहित नाही. शेत सर्व्हे नंबर ७४/१ चा नवीन सर्व्हे नंबर २३९ झाला किंवा कसे मला माहित नाही. प्रतिवादी क्र. ०२ ते ०६ चे सासरे नामे शामराव यांच्या वाटणीस सर्व्हे नंबर ७४/२ आला किंवा कसे मला माहित नाही. शेत सर्व्हे नंबर ७४/२ चा सर्व्हे नंबर २३८ झाला किंवा कसे मला माहित नाही. शेत सर्व्हे नंबर ७४ पैकी पश्चिमेस बापुराव व पुर्वेस शामराव अशी वाटणी झाली किंवा कसे मला माहित नाही. शेत सर्व्हे नंबर २३८ व २३९ हे मुळ सर्व्हे नंबर ७४ चे भाग आहेत किंवा कसे मला माहित नाही. मूळ सर्व्हे नंबर ७४ च्या दक्षिण बाजून शिवेने जाणे येण्याकरीता

रस्ता होता किंवा कसे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, शेत सर्व्हे नंबर ७४ च्या पुर्वेस शिव लागून आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी हा मुळ सर्व्हे नंबर ७४ च्या दक्षिण दिशेने लागून असलेल्या रस्त्याने जाणे येणे करीत होता. हे म्हणणे खरे नाही की, रस्त्याबद्दलची माहिती प्रतिवादी क्र. ०२ ते ०६ यांनी मला दिली होती.

प्रश्न:- तुमचे शेत सर्व्हे नंबर २३८ मध्ये जाण्याकरीता शिव सोडून दुसरा कोणताही रस्ता नाही.
उत्तर:- आम्हाला लागून शिव आहे.

हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या शेताला फक्त शिवेचा रस्ता आहे. हे म्हणणे खरे नाही की, शेत सर्व्हे नंबर २३८ व २३९ ला फक्त शिवेचा रस्ता उपलब्ध आहे. मी दिनांक २१.०७.२०२० रोजी झालेल्या मोजणीची क प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर मोजणीच्या वेळेस माझ्या शेतातून जाणा-या रस्त्याचा उल्लेख केला होता. हे म्हणणे खरे नाही की, मोजणी करणा-या अधिका-यास शेतातील रस्त्याची माहिती देण्यात आली होती. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २६.११.२०२० रोजीच्या खरेदी खतामध्ये मी व प्रतिवादी क्र. ०२ ते ०६ यांनी जाणीवपुर्वक रस्त्याचा उल्लेख केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शेतातून वादीचा १५ फुटाचा रस्ता आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर बाब मी जाणीवपुर्वक लपवून ठेवलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शेतातून वादीचा पुर्वापार रस्ता आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर रस्ता अडविण्याचा मला अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीचे व माझे पुर्वी संयुक्त शेत असल्यामुळे त्याला दुसरा रस्ता असण्याचे कारण नाही. हे म्हणणे खरे

नाही की, माझ्या शपथपत्रातील मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

स्वा/-
(पी.एल.पाटील)
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
समुद्रपूर

दि.०५.०३.२०२६